रविवार दि.३० मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे






RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१९५ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


# रखडलेली कामे तात्काळ मार्गी लावा–आ.मनोज कायंदे

## सिंदखेड राजा येथे आमसभा व सरपंच मेळावा उत्साहात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | प्रतिनिधी**

ग्रामविकासाच्या कामांत अडथळा आणणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि ठेकेदारांना पाठीशी घातले जाणार नाही. संबंधितांवर योग्य ती कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट निर्देश आमदार मनोज कायंदे यांनी दिले. आयोजित मतदारसंघाच्या वार्षिक आमसभा व सरपंच मेळाव्यात विविध समस्या आणि प्रशासनाच्या ढिलाईवर सखोल चर्चा झाल्यानंतर त्यांनी प्रशासनाला चांगलीच तंबी भरली. स्थानिक मातोश्री मंगल कार्यालयात ही वार्षिक आमसभा व सरपंच मेळावा दि.२९ मार्च रोजी संपन्न झाला.

या आमसभेला प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष नाझेर काझी, देवीदास ठाकरे, विष्णू मेहेत्रे, श्यामभाऊ जाधव, इरफान अली, गटविकास अधिकारी अंकुश म्हस्के पाटील, तहसीलदार दीपक घुगे, सिंदखेड राजाचे तहसीलदार अजित दिवटे, युवराज नागरे, कचरूजी बावस्कर, सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष भगवान पालवे हे उपस्थित होते. वार्षिक आमसभा व सरपंच मेळावा सन २०२४–२०२५ मध्ये आमदारांनी मतदारसंघातील आढावा घेऊन ग्रामपातळीवरील पाणीटंचाई, शिक्षण, आरोग्य, बांधकाम आणि वनपरिक्षेत्र यासह महसूल व जलसंधारण या क्षेत्रांतील विविध समस्यांवर विचारमंथन करण्यात आले. ग्रामविकासाच्या कामांमध्ये ढिलाई दिसून येत असल्याने आमदार कायंदे यांनी नाराजी व्यक्त केली. जल जीवन मिशन अंतर्गत कोट्यवधींच्या



निधीचा वापर होऊनही ग्रामपातळीवर अजूनही पाण्यासाठी वणवण सुरू आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. अपूर्ण कामे वेळेत न करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याचे आणि संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश त्यांनी दिले. त्याचबरोबर आढावा घेताना तालुक्यातील मागील वर्षीचे विहीर अधिग्रहणाचे ५६ लाख रुपये बाकी असून, वरिष्ठ कार्यालयास सूचविले असून, ते आल्यानंतर लवकरच वाटप करण्यात येणार आहे.तसेच तालुक्यातील विझोरा येथील घरकुल लाभार्थी यांची पाहणीसाठी आलेल्या कर्मचाऱ्याने पैशाची मागणी केलेली तक्रार विनायक पाटील यांनी केली. यावेळी संबंधित कर्मचाऱ्यांची लेखी तक्रार पंचायत समिती यांच्याकडे करण्याचे आमदार मनोज कायदे यांनी सूचविले. लेखी तक्रारीवर एक उच्चस्तरीय समिती नेमून दोषी आढळल्यास कारवाई करण्यात येईल, असे सांगितले.तालुक्यात २१० अंगणवाडी असून, फक्त १०८ इमारत आहे. ही बाब यावेळी निदर्शनास आली. सदर आमसभेसाठी तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, सदस्य व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी सिंदखेड राजाचे ठाणेदार ब्रम्हदेव शेळके, किनगाव राजाचे ठाणेदार विनोद नरवाडे, साखरखेर्डाचे ठाणेदार गजानन करेवार व बिबीचे ठाणेदार संदीप पाटील हे उपस्थित होते.

## आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते भूमि अभिलेख इमारत भूमिपूजन सोहळा संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा | संतोष पा.जाधव**

दि.२९ मार्च २०२५ रोज शनिवारी लोहा येथे भूमि अभिलेख इमारतीचा भूमिपूजन सोहळा नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार तथा लोहा कंधार विधानसभेचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी नांदेड चे जिल्हाधिकारी श्री राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली, उपविभागीय अधिकारी कंधार श्रीमती अरुणा संगेवार, लोहा तहसीलदार श्री विठ्ठलराव परळीकर यांच्यासह सर्व प्रशासकीय अधिकारी व महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवोदय पॅटर्नमध्ये परफेक्ट इंग्लिश स्कूल पेठवडज शाळेचे शतक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव पा.कळकेकर**

परफेक्ट इंग्लिश स्कूल, पेठवडज या नामांकित शैक्षणिक संस्थेने पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध करत नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत अभूतपूर्व यश संपादन केले आहे. आतापर्यंत १०१ विद्यार्थी नवोदय विद्यालयासाठी पात्र ठरले असून, सन २०२४–२५ च्या शैक्षणिक वर्षात इयत्ता आठवीतील ५ त्यामध्ये अरविंद पांडुरंग मेकवाड, सायली बालाजी तेलवाड, श्रुती शिवशंकर शिंदे, वैष्णवी ज्ञानेश्वर अभंगे, शहरीश नजीर मोमीन आणि इयत्ता पाचवीतील ३ विद्यार्थी त्यामध्ये पायल वसंत कोंडमवार , विराज विजय येडे , अस्मिता गौतम टोम्पे या विद्यार्थ्यांनी नवोदय प्रवेश परीक्षेत यश मिळवले आहे.परफेक्ट इंग्लिश स्कूलच्या या




उल्लेखनीय यशामागे संस्थेचे सचिव आदरणीय गोविंदराव केंद्रे आणि संस्थेचे अध्यक्ष गिरधारी केंद्रे साहेब यांचे दूरदर्शी नेतृत्व व शैक्षणिक क्षेत्रातील बहुमोल योगदान आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्यात आत्मविश्वास वाढावा आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने संस्थेने विशेष प्रयत्न केले आहेत. संस्थेच्या व्यवस्थापनाच्या कठोर परिश्रमांचे आणि शिक्षकवृंदांच्या समर्पणाचेच हे फळ आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशामागे त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचा मोठा वाटा आहे. नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठी संपूर्ण शालेय व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार मार्गदर्शन शिबिरे, सराव चाचण्या, वेळोवेळी घेतलेल्या परीक्षांचे विश्लेषण आणि सुधारणा या गोष्टींवर भर दिला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांची वैयक्तिक पातळीवर तयारी करून घेतली आणि त्यांना परीक्षेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबतीत तयार केले.

परफेक्ट इंग्लिश स्कूलच्या या भव्य यशाबद्दल विद्यार्थी, पालक, शिक्षकवृंद आणि संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे. नवोदय विद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने आणि कौशल्याने हे यश संपादन केले आहे, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. पालकांनी शाळेच्या व्यवस्थापनाचे आणि शिक्षकांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.संस्थेने आजवर अनेक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देऊन त्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी सक्षम बनवले आहे. भविष्यातही ही गुणवत्ता कायम ठेवत आणखी विद्यार्थी नवोदय विद्यालय आणि इतर शैक्षणिक स्पर्धांमध्ये यश मिळवतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.







# करडखेड येथे अवैध धंद्यांचा सुळसुळाट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर | जयपाल दावनगीरकर**

देगलूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या करडखेड येथे पोलीस दूरक्षेत्र चौकी कार्यालय आहे. या कार्यालयाच्या पन्नास मिटरच्या आत अवैध धंद्याचे ग्रहण लागले आहे. त्यामुळे यातून गुन्हेगारी वाढत आहे, अवैध धंदेवाल्यांची चांगली चलती असल्याचे दिसून येत आहे. याकडे मात्र पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा करडखेड गावात सुरू आहे.

करडखेड या गावात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे चांगले तेजीत सुरू आहेत. या गावात बेकायदा गावठी हातभट्टीची दारू, शिंदी विक्री राजरोसपणे सुरू आहे. खुलेआम मटका, गुटखा, डिझेल, पेट्रोल आणि विविध कंपनीच्या घरगुती गॅस सिलेंडर बाळगून परवाना नसताना खुलेआम विक्री होत आहे. तसेच बाऱ्हाळी ता. मुखेड येथील मंगलम गॅस एजन्सीला देगलूर तालुक्यात परवानगी नसताना करडखेड गावात या गॅस एजन्सीला कोणी परवानगी दिली, परवानगी दिली असेल तर करडखेड गावातील बस स्थानक शेजारी एका पान टपरीतून मनमानी कारभाराने विक्री केली जात आहे. बाऱ्हाळी येथील मंगलम गॅस एजन्सी करडखेड येथे बेकायदेशीर बाळगलेल्या सतीश गुज्ञलवार या व्यक्तीने प्रधानमंत्री गॅस सिलेंडर फ्री असताना एका स्त्रीला तुझ्या नावाचे फ्री गॅस आले नसल्याचे सांगून दुसऱ्या व्यक्तींलाच विक्री करून टाकले असल्याची तक्रार समोर आली आहे. यांची तक्रार व चौकशी केली असता दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी प्रधानमंत्री फ्रि गॅस सिलिंडर व चुल त्वरित त्या स्त्रीला देण्यात आल्याचे कळते काहीना अद्यापही



देण्यात आले नाही. या फुकट योजनेची योजना गोरगरीबांच्या नावे येऊन सुद्धा आले नाही असे सांगून परस्पर वाटेल त्या लोकांना पाच ते सहा हजार रुपयांना दुसऱ्याच व्यक्तीस विक्री केली हि योजना फक्त पैसा कमावण्याचा साधन बनले आहे अशी चर्चा नागरिकांतून होत आहे.

या अवैध धंद्याविरुद्ध सर्वसामान्य माणसाने आवाज उठवल्यास आमचा धंदा कोणीच बंद करू शकत नाही, असा दमच अवैध धंदेवाले देतात त्यामुळे करडखेड गावात अवैध धंदे जोमात सुरू आहेत. येथील कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची धुरा पोलिसांची आहे मात्र सध्या या गावात अवैध धंद्यांचा विळखा पडला आहे. करडखेडच्या कार्यक्षेत्रात अनेकांनी अवैध धंदे बंद करण्यासाठी निवेदने, तक्रारी अर्ज दिले असता चार दिवस आदळ आपटीने बंद करून नौटंकी केली जाते परंतु चार दिवसानंतर चित्र जैसे थे होताना दिसून येत आहे. गुन्हे अन्वेषण विभाग अवैध धंदे बंद करण्याचे धाडस दाखवतील काय ? असा प्रश्न नागरिकांत उपस्थित करत आहेत. या अवैध धंद्याकडे जिल्हा पोलीस अधीक्षक याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे. या करडखेड गावात मुंबई – कल्याण मटका, गुटखा, अवैध गावठी हातभट्टीची दारू, शिंदी, डिझेल, पेट्रोल आणि अवैधरित्या विविध कंपनीच्या घरगुती गॅस सिलेंडर बाळगणाऱ्या तसेच बाऱ्हाळी तालुका मुखेड येथील मंगलम गॅस एजन्सी देगलूर तालुक्यातील करडखेड गावात कोणी परवानगी दिली असेल नसेल तरी सर्रास अवैध रित्या विक्री चालू आहे. या अवैध धंद्यामुळे तरुण युवक वाममार्गाला लागत आहेत व गोरगरिबांची लूट होत आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाची प्रतिमा मलीन होताना दिसत आहे. याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# लोकशाही पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी शुभांगी पाटील यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**पुणे । प्रतिनिधी**

लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य उद्योग विकास समितीच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड श्रद्धा कंडूडे प्रदेश अध्यक्षा,संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती, पांडुरंग साळुंके पुणे जिल्हा अध्यक्ष यांनी

संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, आयेशाखान मुलानी, मराठवाडा सचिव बाजीराव पाटील कळकेकर , निलोफर शेख प्रदेश अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, साजेद सय्यद, अनिस कुरेशी यांच्या आदेशानुसार केली. या यावेळी संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य म्हणाले की, पाटील ह्या ब्युटी पार्लर, टेलरिंग क्षेत्रात कलासेस च्या माध्यमातून महिला आपल्या पायावर उभा करीत आहेत. गारमेंट क्षेत्रातील मोठं क्लस्टर उभा करून अनेक महिलांना रोजगार निर्मिती करणार आहे. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन निवड केली आहे. तसेंच लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य पत्रकारांच्याआणि महाराष्ट्र मधील तमाम सर्व सामान्य नागरिकांचे देखील विविध मागण्या शासन दरबारी मांडून मंजूर करून घेणार आहेत. विविध समित्या स्थापन करून महाराष्ट्र राज्यात तालुक्यात सर्वत्र विकास केला जाईल. विविध कार्यक्रम साजरे केले जातील. एक वेगळा ठसा उमटवण्याचा लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल.

नवनिर्वाचित पदाधिकारी शुभांगी पाटील म्हणाल्या की, पुणे शहर सह संपूर्ण महाराष्ट्र मध्ये उद्योग क्षेत्रात मोठी क्रांती उद्योग उभारून करू. महिलांना विविध उद्योगाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक सक्षम करू. मला खात्री आहे की, शासन सर्व तो परी सहकार्य करील.असेही निवडी प्रसंगी त्या म्हणाल्या होत्या. शब्द सुमानाने पाटील यांचा सत्कार करून संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती सुनंदा केदार, मराठवाडा उपाध्यक्ष दत्ता भाऊ नरनाळे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य , संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती मनमोहन तोमर नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष,शिवराज बिराजदार सोलापूर शहर उपाध्यक्ष,नवी मुंबई सरचिटणीस बालाजी सूर्यवंशी, लक्ष्मण भोसले – सोलापूर शहर सचिव,

जस्मित तोमर – नवी मुंबई महिला आघाडी, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती श्रद्धा कंडूडे, मराठवाडा सचिव बाजीराव पाटील कळकेकर,मराठवाडा युवक अध्यक्ष दिपक भाऊ थोरात,प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.



# लहान वयात मोठा संकल्प अबुबकर व हुजेफ सय्यद यांचा सलग रोजा उपवास

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी मुस्लीम समाजातील पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने अनेक धर्माभिमानी उपवास (रोजा) धरतात. मात्र, लहान वयातही या पवित्र परंपरेचे पालन करत सलग रोजा ठेवणाऱ्या दोन भावंडांचे विशेष कौतुक होत आहे.

येथील मोहम्मदीया कॉलनीतील रहिवासी अबुबकर सिकंदर सय्यद (वय १४, इयत्ता ७ वी) आणि हुजेफ सिकंदर सय्यद (वय १०, इयत्ता ४ थी) या दोन भावंडांनी २ मार्चपासून सुरू झालेल्या रमजान महिन्यातील आतापर्यंत सर्व उपवास पूर्ण केले आहेत. विशेष म्हणजे, त्यांनी आणखी चार दिवस रोजा ठेवण्याचा संकल्प केला आहे.अत्यंत लहान वयात एवढे दिवस उपवास धरून त्यांनी मोठ्यांना प्रेरणा देणारा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या चिकाटीचे, श्रद्धेचे आणि धर्मनिष्ठेचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. अबुबकर व हुजेफ यांचे कुटुंबीय आणि मित्रपरिवार त्यांना प्रोत्साहन देत असून, त्यांच्या या भक्तिभावाने संपूर्ण समाजात सकारात्मकता निर्माण केली आहे. या दोन भावंडांच्या कठोर साधनेमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरही त्यांच्या या भक्तिपूर्ण उपक्रमाचे कौतुक करत आहेत.



# आदर्श युवा समाजसेवक पुरस्काराने सुदर्शन बोराडे सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । विष्णू मोहन पोले**

: अखिल सोनार समाज प्रतिष्ठान, अंबाजोगाई चा मानाचा आदर्श युवा समाजसेवक पुरस्कार आज मान्यवरांच्या हस्ते शानदार सोहळ्यात विश्वकर्माय विकास महामंडळ महाराष्ट्र राज्य युवा अध्यक्ष सुदर्शन बोराडे यांना प्रदान करण्यात आला.या शानदार सोहळ्याचे आयोजन प्रतिष्ठान चे संस्थापक मा. राजेशभाऊ पंडीत रेणापूरकर यांनी पंढरपूर येथील आनंदी विनायक मंगल कार्यालय येथे केले होते. व्यासपीठावर मा. प्रकाशदादा वेदपाठक, सोनार हितकारणी सभा महाराष्ट्र राज्य चे अध्यक्ष *मा. संजयजी मंडलिक नाशिक, त्रंबकेश्वर सोनार समाज संस्थेचे अध्यक्ष मा. दिलीपशेठ शहाणे, मा. गोपाळशेठ कुलथे, सातारा समाज अध्यक्ष * पाथ्रीकर, नागपूरचे पत्रकार मा. दिनेशजी येवले साहेब, बारामतीचे * व्होनमाने, गणेशशेठ जोजारे, संतोषजी सोनार, मा. संजयजी तळेकर, मा. राजेंद्रजी पारखे, लोणी येथील *मा. दत्तात्रय मैड, मा. अशोककाका मैड, मा. विजयकुमार दिक्षित, मा. मोहनशेठ पोतदार, सोलापूर चे *मा. निलेशभैय्या धारशिवकर, मा. रोहिणीताई कस्तुरे आदी उपस्थित होते.हा शानदार सोहळा पंढरीत आयोजित करून सर्व शाखीय सोनार समाजाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करीत आसल्या बद्दल * आयोजक राजेशभाऊ पंडीत रेणापूरकर यांचा पंढरपूर सोनार समाजाच्या वतीने शाल, पुष्पहार, मानाचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला.* या वेळी संस्था अध्यक्ष मा. अरूणशेठ मंजरतकर, संस्था उपाध्यक्ष *मा. संजयशेठ ढाळे, संस्था सहसचिव व भारतीय नरहरी सेनेचे संस्थापक *मा. काकासाहेब बुराडे, पंढरपूर सोनार समाज अध्यक्ष *मा. उमेशभाऊ माळवे,मा. समाज अध्यक्ष मा. अनिलशेठ ढाळे, मा. प्रसादभैय्या ढाळे, मा. आनंद शहाणे महाराज आदी उपस्थित होते, या सन्मान सोहळ्यास महाराष्ट्रातून सर्व शाखीय सोनार समाज बांधव व भगिणींनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती.



## आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभुमीवर

# पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या अध्यक्षते खाली उदगीर येथे शांतता कमिटी बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

आगामी रामनवमी आगामी रामनवमी ,गुढीपाडवा व रमजान ईद मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात येणार असून त्या अनुषंगाने जिल्हयात सामाजिक सलोखा, शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी या दृष्टिने पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे अध्यक्षतेखाली आज दि. २८ मार्च रोजी उदगीर पोलीस ठाण्यात रामनवमी महोत्सव समितीचे पदाधिकारी व सदस्य तसेच रमजान ईद निमित्त मुस्लिम बांधव यांचे उपस्थितीत बैठक पार पडली.

सदर बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी (उदगीर) मनीष कल्याणकर, उदगीर शहर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरसिंह आनलदास,उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी, तहसीलदार उदगीर राम बोरगावकर यांच्यासह इतर प्रशासकीय विभागाचे अधिकारी कर्मचारी तसेच रामनवमी कमिटीचे अध्यक्ष अजय नवरखेले, गोविंद अण्णा केंद्रे, गुलाबराव पटवारी, मौलाना हाजीउर रेहमान, मौलाना जाकीर आत्तार, यांच्यासह विविध जाती धर्माचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदरच्या उत्सव अनुषांगाने आयोजित कार्यक्रम व त्यांना येणाऱ्या समस्यां बाबत चर्चा करुन मार्गदर्शन करण्यात आले. श्री.सोमय मुंडे,यांनी आवाहन केले आहे की,सण–उत्सवानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये ध्वनी प्रदुषण नियमांचे उल्लघंन होणार नाही याची दक्षता घ्यावी.जयंती उत्सव दरम्यान अचानक एखादा प्रश्न उपस्थित झाल्यास त्याची प्रशासनास माहिती द्यावी.मध्ये वाहतुक नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.मिरवणुका ह्या ज्ञा/ डॉल्बी विरहीत, पारंपारीक वाद्याचा वापर करुन दिलेल्या मार्गानेच व नेमुण दिलेल्या वेळेच्या आत शांततेत पुर्ण करव्यात. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सदरचे उत्सव विधायक कार्यक्रम करुन साजरा करण्यात येईल. उत्सव समिती, नागरीक व पोलीस यांचे समन्वयाने जिल्हाभरात उत्साहात व शांततेत पार पडेल अशी अपेक्षा पोलीस अधीक्षक यांनी व्यक्त केली.सदर बैठकीस लातूर जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक,शांतता कमिटीचे सदस्य, रामनवमी मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती, व्यापारी बांधव, मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# कवी आपल्या भेटीला



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आंबड । विष्णू मोहन पोले**

*जागतिक कविता दिनानिमित्त सावित्रीबाई फुले स्कूल शिरवळ मध्ये कवयित्री सौ.वसुंधरा निकम व सौ. वैशाली महाडिक यांचे कवी आपल्या भेटीला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सौ वसुंधरा निकम ह्या उत्कृष्ट लेखिका / कवयित्री आहेत. त्यांना काव्यभूषण पुरस्कार साहित्य प्रेरणा गौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांचे पुस्तक प्रकाशित आहे. त्यांनी प्रथम जागतिक कविता दिनाविषयी माहीती दिली. विद्यार्थ्यांकडून त्यांच्या कविता म्हणुन घेतल्या विद्यार्थ्यांनी त्याला खूप छान प्रतिसाद दिला.

विद्यार्थ्यांनी त्यांना काही प्रश्न विचारले त्यांनी त्या प्रश्नांची समाधानकारक असे उत्तर दिले. कवितेचे प्रकार कोणते असतात कविता कशी लिहावी याचे देखील त्यांनी अगदी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. त्यांच्या या मार्गदर्शनामुळे मुलांना कविता लिहिण्यासाठी प्रेरणा मिळाली. सौ.वसुंधरा निकम मॅडम यांचे नुकतेच प्रकाशित झालेले अक्षर पुष्प हे पुस्तक स्कूलला भेट दिले. विद्यार्थ्यांनी ही त्यांच्या कवितांचे वाचन केले पाहुण्यांचा सत्कार शाळेचे संस्थापक मा. प्रतापराव निकम सर व सौ. मधुबाला मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. पद्मजा शेळके यांनी केले आणि आभार सौ. महादेवी कांबळे यांनी मानले.

# आ.रोहित पवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी–सकल धनगर समाज आंबड शहर व तालुक्याच्या वतीने निवेदन सादर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आंबड । विष्णू मोहन पोले**

आमदार रोहित पवार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी सकल धनगर समाज आंबड शहर व तालुक्याच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देऊन करण्यात आली. या मागणीमागचे कारण म्हणजे धनगर समाजाचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर झालेल्या हल्ल्याशी रोहित पवार यांचा संबंध असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दि. १ जुलै २०२१ रोजी सोलापूर शहरामध्ये झालेल्या 'घोंगडी बैठक' कार्यक्रमादरम्यान आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर हल्ला झाला होता. हा हल्ला आमदार रोहित पवार यांच्या सांगण्यावरून घडवण्यात आल्याचा आरोप शरद पवार यांचे कट्टर समर्थक माधव देवकते यांनी विधान भवन परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना केला.तसेच आटपाडी येथे एका टिप्परद्वारे गोपीचंद पडळकर यांना चिरडून मारण्याचा प्रयत्न केला गेला. हा हल्लाही रोहित पवार यांच्या सांगण्यावरून घडवण्यात आल्याचा आरोप आहे. या दोन्ही घटनांमुळे रोहित पवार यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी ठाम मागणी धनगर समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.या प्रकरणी सकल धनगर समाज आंबड शहर व तालुक्याच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. या



निवेदनावर प्रमुख समाज नेत्यांनी स्वाक्षऱ्या केल्या असून, धनगर समाजाच्या भावना दुखावणाऱ्या आणि त्यांच्या नेत्याच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या या घटनांवर कडक कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.धनगर समाजाने शासनाला इशारा दिला आहे की, जर लवकरच रोहित पवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला नाही, तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल. धनगर समाज आपल्या हक्कांसाठी आणि नेत्यांच्या सुरक्षेसाठी लढा देईल, असेही समाजबांधवांनी स्पष्ट केले. याप्रसंगी उपस्थित बळीराम तात्या खटके शारदाताई पांढरे क्ष्मण गायके बाळासाहेब लोकरे सतीश कोल्हे नामदेव कोल्हे सचिन लांडे संजय सातपुते विष्णू लांडे भगवान लांडे अमोल सुरवसे संतोष कोल्हे नीलकंठ गायके सुदर्शन वैराळ साईनाथ खरात दत्ताभाऊ लोकरे बाबू लांडे प्रेमसिंग नारायण जोडणार गणेश गायकवाड आणि इतर सर्व धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

# साहित्याची चूल सतत पेटती ठेवली पाहिजे-डॉ.अभिजीत जाधव

## फलटण येथे रौप्य महोत्सवी साहित्यिक संवाद उत्साहात





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**फलटण । प्रतिनिधी**

फलटण साहित्य हे समाज घडवण्याचे प्रभावी साधन आहे. त्यामुळे साहित्यिकांनी आपले लिखाण योग्य पद्धतीने करून समाजाला दिशा दिली पाहिजे. प्रत्येक साहित्यिकाची प्रतिभा या वेगवेगळ्या असतात त्यामुळे साहित्यकृती वेगवेगळ्या प्रकारच्या निर्माण होतात. साहित्यात वेदना, दुःख, दारिद्र्य ,विवंचना दिसली पाहिजे. समाज घडवण्याचे महान कार्य साहित्यिक करत असतात. जे साहित्य वाचाल छापाल व विकले जाईल तेच साहित्य महत्त्वाचे आहे. साहित्याची चूल ही सतत पेटती ठेवली पाहिजे. आपला देश वेगवेगळ्या सामाजिक स्थित्यंतरातून जात आहे यावर साहित्यिकाने प्रकाश टाकला पाहिजे. साहित्य समाजाचा आरसा असतो असे मत फलटणचे तहसीलदार डॉ अभिजीत जाधव यांनी नाना नानी पार्क फलटण येथे आयोजित केलेल्या साहित्यप्रेमी सेवाभावी फाउंडेशन फलटण वनविभाग फलटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या साहित्यिक संवाद साहित्य संमेलनामध्ये व्यक्त केले.

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्रा महादेवराव गुंजवटे होते तर प्राचार्य रवींद्र येवले, सामाजिक कार्यकर्ते युवराज शिंदे संयोजक माणदेशी साहित्यिक ताराचंद्र आवळे, साहित्यिक सुरेश शिंदे, प्रा विक्रम आपटे,प्रा.सुधीर इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. अभिजीत जाधव पुढे म्हणाले की समाज एकसंघ कसा राहील यावर भाष्य केले पाहिजे. सर्वांनी एकत्र येऊन विधायक कार्य केले तर देशाचा विकास व्हायला वेळ लागणार नाही. यासाठी संवादाची फार गरज आहे हा संवाद फलटणच्या साहित्यिक संवादामध्ये होतो ही बाब कौतुकास्पद आहे. त्यासाठी साहित्यिकांनी समाजभान जपले पाहिजे व निकोप समाज निर्माण केला पाहिजे. निखार्यावरचा जाळ होण्यापेक्षा सुविचारांचा हार झालेले कधीही चांगले.अध्यक्ष स्थानावरून बोलताना महादेवराव गुंजवटे म्हणाले की, पहा ऐका व व्यक्त व्हा हाच या साहित्यिक संवादाचा महत्त्वाचा भाग आहे. आज पंचविसावा साहित्यिक संवाद हा विशेष कार्यक्रम साहित्यिक संवाद साहित्य संमेलनाने साजरा होत आहे ही आनंदाची बाब आहे. नाविन्याचा शोध घेत साहित्यात काम केले तर उत्कृष्ट साहित्य निर्माण होते व हेच साहित्य आपणास ऊर्जा देते. गेल्या दोन वर्षाच्या साहित्यिक संवादातून २० ते २२ पुस्तके प्रकाशित झाली हेच या साहित्यिक संवादाचे यश आहे. साहित्यिक संवादाने दिलेले लिहिता हाताला बळ. नव लेखकांनी कवींनी बारकाईने वाचन करून सामाजिक परिस्थितीवर भाष्य केले तर सकारात्मक विचार जोपासला जाईल. मला काय मिळेल यापेक्षा मला कसे अधिक साहित्यिक ज्ञान मिळेल याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. फलटणचा साहित्यिक संवाद हा निश्चितच फलटणकरांना दिशादर्शक ठरेल यात शंका नाही.यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माणदेशी साहित्यिक व संमेलनाचे संयोजक ताराचंद्र आवळे यांनी केले, युवा लेखक विकास शिंदे यांनी प्रास्ताविक केले तर रानकवी राहुल निकम यांनी आभार मानले. यावेळी डॉ अशोक शिंदे , प्रमोद जगताप ,अतुल चव्हाण, गिरीश बनकर, नवनाथ कोलवडकर ,आशा दळवी ,गुंडाराज नामदास, हरिराम पवार ,नितीन नाळे ,भारती जगदाळे संजय पांचाळ यांनी आपल्या विविध आशयाच्या बहारदार कविता सादर करून संमेलनामध्ये एक वेगळाच ठसा उमटवला. यावेळी फलटण तालुक्यातील लेखक कवी साहित्यप्रेमी लिहिते हात व वाचक यांना विशेष सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी ऍड श्रेयश कांबळे रोहिणी भंडलकर, वंदना सूळ, राजेंद्र बोंद्रे वीरसेन सोनवणे सचिन जाधव शुभम शेळके अक्षय धायगुडे विकास काळे किशोर कांबळे गणेश रणदिवे त्याचबरोबर फलटण तालुक्यातील साहित्यप्रेमी वाचक लेखक कवी यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.गत दोन वर्षात साहित्यिक संवाद या उपक्रमातून सहभागी साहित्यिकांची २२ पुस्तके प्रकाशित झाली यामध्ये कथा कादंबरी ,समीक्षा, स्फुट लेखन , अनुवाद ,चरित्र आशा विविध विषयांना साहित्यिकांनी गवसणी घातली.

## लिट्ल फ्लॉवर कॉन्व्हेन्ट स्कूल बिलोली शाळेच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सगरोळी । उत्तम घाटे**

अध्ययन संस्था मुंबई व संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अध्ययन संपर्क गणित विज्ञान मंडळाची प्रश्नमंजुषा स्पर्धा-२०२५ श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल, सगरोळी येथे घेण्यात आली. यामध्ये लिट्ल फ्लॉवर कॉन्व्हेन्ट इंग्रजी माध्यम स्कूल बिलोली या शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवीले यामध्ये प्राथमिक गटातून कु.मटके सर्वमंगला मारोती व कु.बाळके ऋतुजा सुधाकर यांच्या गटाने प्रथम क्रमांक मिळवला तर माध्यमिक गटातून कु.रचना महेश मठवाले व कु.नशरा रोजमीन नैमुला यांच्या गटाने द्वितीय क्रमांक मिळवला. याबद्दल आयोजकांच्या वतीने प्रमाणपत्र ट्रॉफी व बक्षीस



देऊन गौरविण्यात आले.सर्व विजयी स्पर्धकांचे शाळेच्या प्राचार्या सौ.के.रजनी राणी यांच्यासह मुख्याध्यापक सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.या स्पर्धेसाठी सात शाळा सहभागी झाल्या होत्या.सर्वच शाळांतील विद्यार्थ्यांनी अध्ययन संपर्क मासिकाचा अभ्यास करून छान प्रतिसाद दिला.

## कायस्थ फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड ची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

अर्धापूर तालुक्यातील नाबार्ड अंतर्गत काम करत असलेल्या कायस्थ फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड ची आज दिनांक २८ मार्च २०२५ रोज शुक्रवारी वार्षिक सर्वसाधारण सभा लोणी तालुका अर्धापूर येथे आयोजित करण्यात आली. याच सोबत कंपनीच्या दुसऱ्या दुध संकलन केंद्राचा शुभारंभ मान्यवर अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. कंपनीचे पहिले दुध संकलन मौजे बामणी तालुका अर्धापूर येथे कार्यरत आहे.तेथील शेतकऱ्यांना




दुधाचा योग्य मोबदला मिळत आहे.म्हणून तेथील शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. हा प्रतिसाद पाहता कंपनीने दुसरे दुध संकलन केंद्र आज सुरू केले आहे. या दुध संकलन केंद्राच्या शुभारंभ प्रसंगी उद्घाटक म्हणून १.श्री हरीदत्त पोद्दार सर उप महाप्रबंधक नाबार्ड क्षेत्रीय कार्यालय पुणे २.श्री दिलीप दमय्यावार सर जिल्हा विकास प्रबंधक, नाबार्ड नांदेड ३.श्री रमेश राठोड सर अध्यक्ष, वनश्री सामाजिक व सांस्कृतीक संस्था भोकर आदी मान्यवर लाभले होते. शेतकऱ्यांना दुध उत्पादनात पशू आरोग्य अबाधित राखण्यासाठी विशेष मार्गदर्शन मिळाले डॉ श्री अरविंद गायकवाड सर सहाय्यक आयुक्त जिल्हा पशू वैद्यकीय सर्व चिकित्सालय नांदेड आणि डॉ श्री कैलास गिते सर कार्यक्रम सहाय्यक, कृषी विज्ञान केंद्र तोंडापूर कळमनुरी. कार्यक्रमासाठी सरपंच, उप सरपंच, पोलीस पाटील प्रतिष्ठित नागरिक,गावातील सर्व दुध उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

### दैनिक लोकमतवर कायदेशीर कारवाई करावी म्हणून

## छत्रपती संभाजीनगर येथे गोर बंजारा समाजातर्फे मुख्यमंत्र्याना निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । विष्णू मोहन पोले**

छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक २३ रोजी सकल गोर बंजारा समाजाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक साहेबांची अप्रतिष्ठा करणाऱ्या दैनिक लोकमतवर कायदेशीर कारवाई करावी म्हणून आज दिनांक २६ मार्च रोजी राज्यभरातील गोर बंजारा समाज बांधवांनी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदारद्वारे मोठ्या प्रमाणावर निवेदन देण्यात आले.

आज छत्रपती संभाजीनगर येथे



वसंतराव नाईक सामाजिक न्याय हक्क कृती समितीतर्फे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.याप्रसंगी नायक सुखदेव राठोड, हिरासिंग जाधव, प्रा. फुलसिंग जाधव, प्रा. सुभाष चव्हाण, राजपालसिंग राठोड, डॉ. कृष्णा राठोड, एडवोकेट अशोक राठोड, रोहिदास पवार, रोहिदास जाधव, वैजीनाथ राठोड, गणपत पवार, देवीदास राठोड, कैलाश राठोड, भगीरथ कांबळे, जी.के. राठोड, के. एच. जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## जवाहर नवोदय विद्यालयात धानोरेचे पाच मुलांना प्रवेश ;धानोरे शाळेचे परिसरात कौतुक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

येथील पुणे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा धानोरे या प्रशालेने आपल्या यापूर्वीचे उच्चांकात आणखी एक नवा उच्चांक शाळेतच्या इतिहासात जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा २०२५ मध्ये पाच विध्यार्थ्यांनी प्रवेश मिळवत नोंदविला आहे. यामुळे पंचक्रोशीत प्रशालेचे अभिनंदन केले जात आहे.

केल्याने होत आहे रे...आधी केलेची पाहिजे..या उक्तीप्रमाणे..पुणे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा धानोरे शाळेचा नवा उच्चांक शाळेच्या इतिहासात घडविला आहे. यात जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी पाच मुलांची निवड झाली आहे. यामध्ये विश्वराज गावडे, कैवल्य



कोळकर, अर्णव कुटे, यश राठोड, गौरव महाजन या मुलांचा समावेश आहे.

या मुलांचे मार्गदर्शक शिक्षिका पूजा नाईक, शर्मिला भगत सर्व विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करून आभार व्यक्त करण्यात आले असल्याचे आदर्श मुख्याध्यापक सत्यवान लोखंडे यांनी सांगितले. या प्रशालेचे प्रेरणास्थान विस्ताराधिकारी राजेंद्र टिळेकर, गट शिक्षणाधिकारी जीवन कोकणे, गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले, शिक्षणाधिकारी संजय नाईकडे मुख्याध्यापक सत्यवान लोखंडे, आळंदी जनहित फौंडेशनचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांचेसह शिक्षकवृंद, जि प आदर्श प्राथमिक शाळा धानोरे, अध्यक्ष व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती धानोरे, सरपंच, उपसरपंच, सदस्य ग्रामपंचायत धानोरे यांनी मुलांचे यशाचे कौतुक करीत शुभेच्छा दिल्या.

## केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालयसाठी शौर्य महेश उगिलेची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पा.कळकेकर**

लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळणी येथील विद्यार्थी शौर्य महेश उगिले या विद्यार्थ्यांची केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालय चिंचोली जिल्हा लातूर येथे प्रवेशाकरिता निवड झाली आहे.लातूर जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालय च्या इयत्ता



सहावी वर्गासाठी जानेवारी मध्ये प्रवेश परीक्षा घेण्यात आली होती. त्याचा निकाल नुकताच लागला असून यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळणी येथील विद्यार्थी शौर्य महेश उगिले याची निवड झाली आहे. त्याच्या या यशाबद्दल समाजात सर्वत्र त्याचे कौतुक होत आहे .ग्रामीण भागातून शिक्षण घेत असताना त्यातून त्याने यश संपादन केले आहे.त्याच्या यशाचे श्रेय त्याने आपल्या शाळेतील मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन अध्यक्ष आणि सर्व गुरुजनांना दिली आहे . त्याच्या या यशाबद्दल त्याचे वडील महेश उगिले, आई अनुराधा उगिले , सोपान उगिले,सविता उगिले, प्रियंका उगिले, शिवराज काळे,अंश उगिले तसेच सर्व मित्र मंडळींनी हार्दिक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आगामी सन,उत्सव शांततेत साजरे करून कायदा व सुव्यवस्था राखण्याचे पोलीस प्रशासनाचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

रमजान ईद, गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावे म्हणून पोलिस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली भोकर शहरात चोख पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे....

येणाऱ्या काळातील रमजान ईद,गुढीपाडवा, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती आदी सण उत्सव शांततेत व हर्ष उल्हासात साजरे व्हावेत, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावे म्हणून कर्तव्य दक्ष पोलिस निरीक्षक अजित कुंभार यांच्याकडून चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छ.शिवाजी चौक, बसटँड, आदी ठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. भोकर शहरात सर्व जातीधर्माला सोबत घेऊन सण उत्सव साजरे होतात तशी परंपरा आहे. येणाऱ्या काळात हे सण उत्सव शांततेत साजरे व्हावेत, कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

# लोहा नगर पालिकेत घरकुल लाभार्थी-बचत गटाना आ.चिखलीकरांच्या हस्ते अडीच कोटी रुपयांचे अनुदान वाटप

## तीन महिन्यात घरकुल लाभार्थ्यांना ५ कोटीचे अनुदान वाटप ;प्रशासक –मुख्याधिकारी यांच्या कामाचा गौरव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा | विशाल घंटे**

लोहा नगर पालिकेत घरकुल योजनेसाठीआमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी १० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला त्याच्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना दिलासा मिळाला असून शनिवारी (२९ मार्च) बचत गटांना १ कोटी २६ लक्ष रुपये , घरकुल लाभार्थ्यांना ८० लक्ष रुपये तर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना रजा रोखीकारणाचे २३ लक्ष रुपयांचे धनादेश आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.शहरातील नागरिकांना कामासाठी नगर परिषदेत त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी असा सूचना त्यांनी केल्या

लोहा नगर परिषदेच्या वतीने तुळजाई मंगल कार्यालयात आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते विविध योजने अंतर्गत अनुदान वाटप व विविध स्पर्धा बक्षीस वितरण करण्यात आले या कार्यक्रमासाठी नगर परिषदेच्या प्रशासक उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, दता वाले, करीमभाई शेख, हरिभाऊ चव्हाण, नरेंद्र गायकवाड, कार्यक्रमाचे आयोजक मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यासह मान्यवरउपस्थित होते

आमदार प्रतापराव पाटील यांनी प्रशासकीय काळात नगर परिषद कारभार अतिशय चांगला सुरू आहे .मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांच्या कामाचे त्यांनीकौतुक केले प्रशासक म्हणून उपविभागीय अधिकारी संगेवार यांचेही काम चांगले आहे असे सांगून वाढते शहर आहे यापुढे ज्यांना घरकुल नाही अशांचा सर्व्हे करावा व घरकुलमंजूर करावे तसेच बगीचा ,मॉर्निंग ट्रक तयार करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला तसेच कामानिमित्त नगर परिषदेमध्ये येणाऱ्यांना त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी से त्यांनीं सर्व समक्ष सांगितले




आमदार प्रतापराव याचा हस्ते दीनदयाळ सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत ३० महिला बचत गटांना १ कोटी२६ लक्ष , ५२ घरकुल लाभार्थ्यांना ८० लक्ष तर सेवानिवृत्त झालेल्या सात कर्मचाऱ्यांच्या वारसांना रजा रोखीकारणाचे२३ ,,लक्ष २३लक्ष ६४ हजार रुपयांचे धनादेश वाटप करण्यात आले तसेच स्वच्छ भारत अंतर्गत चित्रकला, रांगोळी, वेस्ट टू बेस्ट या खुल्या व शालेय स्तरावरील स्पर्धा तसेच महिलांच्या पाककला, होम मिनिस्टर स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस स्मृती चिन्ह आ चिखलीकर, उपविभागीय अधिकारी मुख्याधिकारी , व मान्यवरांच्या हस्ते स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात आले कार्यक्रमासाठी नगर रचना अभियंता कृष्णा कटाळे, उल्हास राठोड, लेखाधिकारी अजिंक्य केंद्रे, संगणक अभियंता चंद्रकांत सुतार, राजेंद्र सोनकांबळे, , पाणीपुरवठा प्रमुख वैजनाथ शेटे , कर निरीक्षक गायकवाड, सोमनाथ केंद्रे,फरीद, शंकर वाघमारे , चांदू राजकोर ,गायकवाड,गजानन दांगटे महाबळे , संतोष मोरे यासह सर्वानी परिश्रम घेतले श्री गवळे यांनी तर आभार नंदू दाढेल यांनी मानले.

### अधिकारी–,कर्मचाऱ्यांचा सत्कार

**लोहा नगर परिषदेच्या प्रशासक उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार , गेल्या चार महिन्यात प्रशासनाला शिस्त लावणारे उत्कृष्ट काम करणारे मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, घरकुल योजनेत परिश्रम घेणारे नगर रचना अभियंता कृष्णा कटाळे, क्रीडा स्पर्धेत यश मिळविणारे निलेश चव्हाण, नंदू दाढेल यांचा आमदार प्रतापराव पाटील यांनी सत्कार केला.**

# हल्लेखोरांना अटक करण्याची भोई समाज अध्यक्षांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कुंडलवाडी | गंगाधर दुसलवाड**



कुंडलवाडी ता.बिलोली जि.नांदेड भोई समाज बांधव शंकर गंगाधर रघुपती वार यास अन्यथा व्यक्तीने दिनांक २० मार्च २०२५ रोजी गावाच्या शेजारी जबर मारहाण करून रक्त बबाळ अवस्थेत गावातील शाळेच्या शेजारी टाकल्यानंतर गावातील व्यक्तीने घरच्यांना आईला निरोप दिल्यामुळे त्याच अवस्थेत घरचे आणि शेजाऱ्यांनी शासकीय दवाखान्यात बिलोली येथे त्यांची अवस्था बघून डॉक्टर यांनी नांदेड येथील शासकीय दवाखान्यात दाखल केल्यानंतर डोक्याला जबर मार लागल्यामुळे मृत्यूची झुंज दे ऑपरेशन केल्यानंतर पेशंट बार झाल्यानंतर रक्तस्त्राव जास्त झाल्यामुळे काल रात्री शासकीय दवाखाना विष्णुपुरी येथे मृत्यू झाला २७ मार्च २०२५ रोजी दुपारी ठीक १ वाजता विष्णुपुरी येथे शासकीय दवाखान्यात ही माहिती कळल्यानंतर भोई समाज समितीचे अध्यक्ष यांनी तिथे जाऊन पीएम चालू असताना सर्व या विषयी माहिती घेतल्यानंतर या प्रकरणाची सखोल तपासणी व्हावी यासाठी सर्व माहिती घेतल्यानंतर मयत शंकर रघुपतिवार यांच्या संशयित मारेकरी यांना हल्लेखोरांना अटक करुन त्यांना शिक्षा देण्यासाठी भोई समाज समन्वय समिती नांदेड हे प्रयत्न करत असून अध्यक्ष राजू अण्णा मामुलवार व पदाधिकारी यांनी या कुटुंबाला न्याय देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.सदर घटनेची दाखल कुंडलवाडी पोलीस स्टेशन घेत नसल्याने या घटनेची नोंद करून का घेत नाही असे भोई समाज समितीचे अध्यक्ष राजू अण्णा मामुलवार यांनी विचारल्यानंतर या घटनेची सदरील पोलीस स्टेशन मध्ये नोंद घेतली असून या घटनेची आरोपींना हल्लेखोरावर कारवाई करून यांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड यांना निवेदन देण्यात आले . या कुटुंबाला न्याय देण्यासाठी भोई समाज समिती नांदेड अध्यक्ष व पदाधिकारी प्रयत्न करत आहे.

# धन्यवाद आमदार राहुल दादा ऐन उन्हाळ्यात पाणी दिल्याबद्दल !

## माजी सरपंच अझरभाई शेख यांनी मानले आभार



लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड | बबनराव धायतोंडे**

दौंड तालुक्यातील मळद,खडकी, नंदादेवी,रावणगाव,स्वामी चिंचोली या गावांना ऐन उन्हाळ्यात दौंड चे आमदार राहुल कुल यांनी मळद येथील खडकवासला नवीन मुठा उजवा कालवा कि.मी.१३५/१०० येथील नवीन एस्कॅप आंदाजे किंमत ५९ लाखाचे बांधकाम करण्यात आले,त्यामुळे मळद,रावणगाव,नंदादेवी, खडकी,स्वामी चिंचोली येथील ओढ्यावरील बंधारे मदत झाली.
सदरचा विषय हा अनेक वर्षापासून प्रलंबित होता,आणि तो आमदार राहुल कुल यांच्यामुळे मार्गी लागला. त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी आमदार राहुल कुल यांचे आभार मानले आणि शेख वस्ती,गुणवरे वस्ती,होले वस्ती,स्वामी चिंचोली येथील शेतकऱ्यांना आज उन्हाळ्याच्या दिवसात पिके वाचविण्यासाठी फार मोठी पाण्याची मदत झाली त्यामुळे येथील शेतकऱ्यांमध्ये आज आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.तसेच येथील माजी सरपंच अझरभाई शेख यांच्या पाठपुराव्याला यश आल्याचे शेतकऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी बोलून दाखवले आणि त्यांचे देखील कौतुक केले.यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि शेतकरी उपस्थित होते.

### धन्यवाद दादा ऐन उन्हाळ्यात पाणी दिल्याबद्दल..

**शेख वस्ती,गुणवरे वस्ती,होले वस्ती व स्वामी चिंचोली गावातील लोकांच्या मागणी नुसार आमदार राहुल दादा कुल यांनी मळद येथे ओढ्याला पाणी सोडण्यासाठी एस्कॅप बसवल्याबद्दल आमदार राहुल दादा यांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानतो.**

**अझरभाई शेख माजी.सरपंच स्वामी चिंचोली.**



















हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904